श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

फेब्रुवारी २०२२ | वर्ष-१०, अंक-२ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८

## डेरवण इंग्रजी माध्यम शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत भारताच्या ७३व्या प्रजासत्ताक दिनाचा सोहळा ट्रस्टच्या क्रीडासंकुलात कोविड-१९ च्या संदर्भातील सर्व नियमांचे पालन करून साजरा करण्यात आला. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनी भूषविले.

सोहळ्याच्या प्रारंभी भारताच्या संविधानाच्या उद्देशिकेचे सर्व उपस्थितांनी सामुहिक वाचन केले. मा. अध्यक्षांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यावर राष्ट्रगीत आणि ध्वजगीत यांचे गायन झाले. भारतीय संस्कृती, परंपरा, विविधतेतील एकता, ऐतिहासिक वारसा, भारतीयांचे विविध क्षेत्रातील योगदान व प्रगती, भारतीयांची देशाप्रती कर्तव्ये, कोविडच्या जागतिक महामारीत विकसित देशांच्या तुलनेत भारताने एकीने दिलेला यशस्वी लढा, लसीकरण मोहीम, संकटकाळात सर्व भारतीयांनी जपलेला बंधुभाव, आयुर्वेद-योग यांचे जगाला पटलेले महत्त्व, पुन्हा नव्या उमेदीने वाटचाल करण्याचा संकल्प, अशा विविध विषयांवर विद्यार्थिवर्गाने आपले विचार व्यक्त केले. यामध्ये शिशुगटापासून उच्च माध्यमिक गटापर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. इंग्रजी, संस्कृत, हिंदी आदी भाषांमधून मुद्देसूदपणे आणि ओजस्वीपणे आपले विचार मांडून विद्यार्थ्यांनी आपल्या वक्तृत्वाने उपस्थितांना प्रभावित केले. पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक गटातील लहान वयाच्या मुलांनीही निर्भयपणे हावभावांसह आपली भाषणे सादर केली.



*झंडा उँचा रहे हमारा ।*

अध्यक्ष मा. श्री. विकासराव वालावलकर यांनीही कार्यक्रमाचे औचित्य साधून सर्व उपस्थितांना संबोधित केले. आजच्या तरुण पिढीशी म्हणजे मुख्यत्वे विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले, '' १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्यावर २६ जानेवारी १९५० रोजी घटना अंमलात आणून आपण भारताला लोकशाही



*डावीकडून – श्रीमती शरयू यशवंतराव, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. सतीशकुमार रामस्वामी, श्री. बाबासाहेब भुतकर, श्री. श्रीकांत पराडकर*

गणराज्याचे स्वरूप दिले. आज आपण ७३वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत. भारतीय राज्यघटनेने आपणाला समानता, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य आदी मूलभूत अधिकार बहाल केले आहेत. आपण सर्वजण भाग्यवान आहोत की आपण स्वातंत्र्याच्या काळात जन्मलो. स्वातंत्र्यपूर्व काळातील जीवन आपण कधीच अनुभवलेले नाही. आणि म्हणून या मूलभूत अधिकारांचे यथायोग्य महत्त्व आपणाला कदाचित समजणार नाही. आपण दिडशे वर्षांचा आपल्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास वाचला आहे. स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार मिळविण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी सोसलेल्या हाल अपेष्टा आपल्याला माहीत आहेत. आज राज्यघटनेने दिलेले अधिकार आपण जन्मसिद्ध अधिकार म्हणून उपभोगीत आहोत. ते मिळविण्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या आयुष्याची होळी केलेली आहे. पारतंत्र्यातले जीवन आपण अनुभवले नसले तरी आपण त्याविषयी कल्पना नक्कीच करू शकतो. म्हणून आपल्या राज्यघटनेचे आपण शतश: आभार मानले पाहिजेत. अत्यंत कृतज्ञतेच्या भावनेने आपण प्रजासत्ताक दिन साजरा केला पाहिजे.

‘‘अधिकार आणि कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, म्हणून अधिकाराबरोबर कर्तव्येही येतात. भारताचा सुजाण नागरीक म्हणून आपली कर्तव्येही आहेत. घर आणि परिसर स्वच्छ ठेवणे, शिस्तपालन करणे, इतरांशी अदबीने बोलणे, वाहतुकीचे नियम पाळणे या सर्व चांगल्या सवयी आपण आपल्यामध्ये अशा बिंबवल्या पाहिजेत की ते आपले नैसर्गिक वर्तन झाले पाहिजे. भारतीय लोक परदेशात पर्यटनाला जातात तेव्हा तेथील शिस्त, नियम सर्व पाळतात, पण भारतात परत आल्यावर ते नियम पाळायला विसरतात असा एक समज आहे. परंतु आता त्यात सकारात्मक बदल दिसू लागला आहे आणि त्याचा मला अभिमान वाटतो.



*राष्ट्रगीत गायन*



*निर्भय वक्तृत्व*





पेशाने डॉक्टर असलेल्या माझ्या मित्राने सांगितलेला अनुभव मी आपणाला सांगणार आहे. हे माझे मित्र एकदा टोकियो शहरात आपल्या जपानमध्ये स्थायिक झालेल्या भारतीय मित्रासमवेत रेल्वेने प्रवास करत होते. त्यांच्या डब्यात आणखीही एक जपानी प्रवासी होता. तो जेथे बसला होता त्या सीटचे कव्हर थोडे फाटले होते. त्याच्या हे लक्षात आल्यावर त्याने आपल्या बॅगेतून सुई आणि दोऱ्याचे रीळ काढले – ते त्याच्याकडे होते हे विशेष – आणि फाटलेले कव्हर व्यवस्थित शिवले. आपला सुई–दोरा पुन्हा बॅगेत ठेवला आणि आपले स्टेशन आल्यावर तो उतरून गेला.

माझ्या डॉक्टर मित्राने सोबतच्या आपल्या मित्राला विचारले की जपानी लोकात एवढी सामाजिक कर्तव्याची भावना कशी काय असते. त्याने उत्तर दिले की जपानी मुलांना सामाजिक कर्तव्याची भावना लहानपणापासूनच शिकविली जाते. जेव्हा ती बालवाडीत जायला लागतात तेव्हा पहिले दीड वर्ष त्यांना फक्त चांगले वर्तन, सामाजिक शिष्टाचार, शिस्त–स्वच्छतेचे पालन, वर्ग स्वच्छ ठेवणे, स्वच्छतागृह स्वच्छ करणे याची सवय लावली जाते आणि दीड वर्षानंतर त्यांचा शालेय अभ्यासक्रम सुरू होतो. कोवळ्या वयातच त्यांच्यावर सामाजिक शिस्तीचा संस्कार केला जातो म्हणून आपल्याला सर्व जपानी नागरिकांमध्ये शिस्त आणि सामाजिक कर्तव्याची भावना दिसते.

''हे उदाहरण सांगण्याचे कारण म्हणजे तुम्ही सारे तरुण आहात. चांगल्या वर्तणुकीची जबाबदारी सर्वांवरच आहे, पण तुमच्या खांद्यावर ती अधिक आहे कारण तुम्ही या भारत देशाचे भावी जबाबदार नागरिक आहात. तुमच्या समोर अखंड आयुष्य आहे. या विशाल जगात वावरताना तुम्हाला वाटेल की इतर जण बेशिस्तीने वागत असताना मी एकटाच कशाला शिस्तीचे पालन करू? तर कृपया हा विचार मनाला शिवू देऊ नका. इतर कसेही वागले तरी तुम्ही आपली सामाजिक सदभिरुची सोडू नका.



*मा. श्री. विकासराव वालावलकर आपले विचार व्यक्त करताना–*
*''समाज म्हणजे भौगोलिक प्रदेश नव्हे तर लोकांचा समुह असतो. प्रत्येकाने सद्वर्तन केले तर आपल्या देशाचा उत्कर्ष नक्कीच होईल.''*

तुमच्या सभ्य, सुसंस्कारित वागण्याचा आदर्श इतरांसाठी घालून द्या, ज्याचे अनुकरण इतर करतील. समाज म्हणजे भौगोलिक प्रदेश नव्हे तर लोकांचा समुह असतो. प्रत्येकाने सद्वर्तन केले तर आपल्या देशाचा उत्कर्ष नक्कीच होईल. भारताचे भविष्य तुमच्या हातात आहे. कर्तव्यांची जाणीव ठेवून, राज्यघटनेप्रती कृतज्ञता बाळगून, सामाजिक जबाबदाऱ्या पाळून आपण प्रजासत्ताक दिन साजरा केला पाहिजे तरच तो खऱ्या अर्थाने साजरा होईल.''

कार्यक्रमाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी शारीरिक लवचिकता दाखविणारी योगनृत्ये, मल्लखांबावरील चित्तथरारक प्रात्यक्षिके सुलभरीत्या सादर करून शारीरिक व मानसिक संतुलनाचा सुंदर मिलाफ प्रदर्शित केला. या कार्यक्रमाला संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखातील विद्यार्थी, शिक्षक, रुग्णालयातील डॉक्टर्स आणि अन्य कर्मचारी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## मोफत बालरोग लसीकरण




दि. ०३. ०२. २०२२ रोजी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात बालरोग लसीकरण विभागाची स्थापना झाली. सर्व विभागप्रमुख, डॉ. एन. के. शर्मा, डॉ. विनोद चौधरी, डॉ. अविनाश लुकडे, डॉ. उन्मेष संतपूर तसेच रुग्णालयातील कर्मचारी कार्यक्रमाला उपस्थित होते. वालावलकर रुग्णालयाला मोफत लसीकरणासाठी शासनमान्यता मिळाली आहे. दर गुरुवारी ही लस १६ वर्षापर्यंतच्या मुलांना आणि गरोदर मातांना सकाळी ९.०० ते दुपारी १.०० या वेळेत देण्यात येईल.

# समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचे गौरवास्पद यश

*''शिक्षण हे चारित्र्य घडविणारे, मन:शक्ती वाढविणारे, बुद्धीचा विकास करणारे व मनुष्याला स्वावलंबी बनविणारे असले पाहिजे''*

– स्वामी विवेकानंद.

राष्ट्राच्या प्रगतीसाठी आणि आर्थिक विकासासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. निव्वळ कागदी पदव्या संपादन करण्यापेक्षा व्यावसायिक शिक्षण घेतल्याने मनुष्याची कार्यकुशलतेच्या दिशेने जडण घडण होते. व्यावसायिक शिक्षण घेतल्यावर लगेच हाताला काम मिळते. स्वावलंबनाचा आनंद मिळतो. आपल्या कामात कौशल्य प्राप्त केल्यावर वैयक्तिक प्रगती तर होतेच, त्याच बरोबर देशाचाही विकास होत असतो.

पदवी संपादन केल्यानंतर युवा पिढीला वर्षानुवर्षे नोकरी शोधावी लागणार नाही तर लगेच आपल्या ज्ञानाच्या आधारे अर्थार्जन करता येईल, असे विज्ञान शाखेवर आधारित विविध व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम श्रीकाका महाराज यांच्या मार्गदर्शनानुसार श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या विविध शैक्षणिक शाखांनी स्वत: रचना करून संबंधित विद्यापीठाच्या मान्यतेने डेरवण येथे उपलब्ध केले आहेत.

मुंबई विद्यापीठाच्या गरवारे इन्स्टिट्युट ऑफ करिअर एज्युकेशन ॲन्ड डेव्हलपमेंट (GICED) च्या सहयोगाने श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युटच्या माध्यमातून डेरवण येथे 'बॅचलर इन बायोमेडिकल इन्स्ट्रुमेन्टेशन' आणि 'बॅचलर इन सायकॉलॉजिकल हेल्थ ॲन्ड बिहेविअरल सायन्स' हे दोन पदवी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सुरू आहेत.

बॅचलर इन बायोमेडिकल इन्स्ट्रुमेन्टेशन अभ्यासक्रमात पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना पुणे, मुंबई, चेन्नई, कोल्हापूर, रत्नागिरी, आदी शहरात नोकरीच्या संधी चालून आल्या आहेत. डी.वाय.पाटील हॉस्पिटल -पुणे, फोर्टिस हॉस्पिटल-मुंबई, फेबर सिंदूरी-चेन्नई, विप्रो जीई हेल्थकेअर-कोल्हापूर, वालावलकर रूग्णालय-डेरवण, इ. नामांकित हॉस्पिटल्स मध्ये बायोमेडिकल इन्स्ट्रुमेन्टेशन विभागात आपले कौशल्य वृध्दिंगत करण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे. ह्या अभ्यासक्रमातील ९९% विद्यार्थ्यांना पदवी मिळताच नोकरी लागली आहे, तर काही विद्यार्थी हे परदेशात पुढील शिक्षणासाठी प्रयत्न करत आहेत.

समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युटच्या बॅचलर इन सायकॉलॉजिकल हेल्थ ॲन्ड बिहेविअरल सायन्सच्या पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदवी संपादन करण्याच्या दिशेने आपली वाटचाल सुरू केली असून गुजरात, कर्नाटक, केरळ, चेन्नई येथील महाविद्यालयात एम.एस्. सी. सायकॉलॉजी करिता प्रवेश घेतला आहे.

मुंबई विद्यापीठाच्या (GICED) द्वारा चालविल्या जाणाऱ्या विविध महाविद्यालयातील निरनिराळ्या पदवी अभ्यासक्रमातून गुणानुक्रमे पहिल्या पाच विद्यार्थ्यांना श्रीमती विमलाबाई गरवारे सुवर्णपदक प्रदान करण्यात येते. समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्यूटच्या 'बॅचलर इन सायकॉलॉजिकल हेल्थ ॲन्ड बिहेविअरल सायन्स' या पदवी अभ्यासक्रमामध्ये मे २०२१ च्या परीक्षेत डेरवणच्या कु.पूनम संतोष गुरव या विद्यार्थिनीने सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या पाच विद्यार्थ्यांमध्ये चौथा क्रमांक संपादन केला. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा मुंबई विद्यापीठाचा वार्षिक दीक्षान्त समारंभ नुकताच पार पडला. या समारंभामध्ये कु. पूनम संतोष गुरव या विद्यार्थिनीला मा. राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते श्रीमती विमलाबाई गरवारे सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. सदर कार्यक्रमास राज्यपालांसहित पर्यटन, पर्यावरण व राज्यशिष्टाचार मंत्री मा.श्री. आदित्य ठाकरे, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री मा.श्री. उदय सामंत, उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री मा.श्री. प्राजक्त तनपुरे तसेच राष्ट्रीय समुद्रशास्त्र संस्था, गोवा चे संचालक मा.प्रा. सुनील कुमार सिंह हे सन्माननिय उपस्थित होते.

बॅचलर इन बायोमेडिकल इन्स्ट्रुमेन्टेशन आणि बॅचलर इन सायकॉलॉजिकल हेल्थ ॲन्ड बिहेविअरल सायन्स च्या सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षणात प्राप्त झालेल्या ज्ञान व कौशल्याचा योग्यरीत्या उपयोग होत असल्याचे सांगून प्राध्यापकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे, तसेच पालक वर्गाकडून समाधान व्यक्त होत आहे. क्रियाशील व उपयुक्त शिक्षणाची संधी उपलब्ध केल्याबद्दल विद्यार्थ्यांनी संस्थेचे विशेष आभार मानले आहेत.



*मा. राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी 'श्रीमती विमलाबाई गरवारे सुवर्णपदक' कु. पूनम संतोष गुरव या विद्यार्थिनीला प्रदान करताना*

# डेरवण रुग्णालयात ‘ट्रान्सफॉरामिनल एन्डोस्कोपी डिस्क हर्निएशन स्पाइन सर्जरी’ कार्यशाळा

भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात दि. १८ जानेवारी ते २४ जानेवारी या कालावधीत ‘ट्रान्सफॉरामिनल एन्डोस्कोपी डिस्क हर्निएशन स्पाइन सर्जरी’ची एक कार्यशाळा ‘मिशन स्पाइन फाउंडेशन’ आणि वालावलकर रुग्णालय यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. अशा प्रकारची अतिशय उच्च दर्जाची प्रशिक्षण कार्यशाळा भारतात अगदी क्वचितच आयोजित केली जाते. या कार्यशाळेत डॉ. सतीशचंद्र गोरे (स्पाइन सर्जन, पुणे),डॉ. सुनील नाडकर्णी (स्पाइन सर्जन, पुणे), डॉ. ओंकार सुदामे (ऑर्थोपिडिक सर्जन, वालावलकर रुग्णालय), डॉ. प्रशांत मुलया (ॲनाटोमी असोसिएट प्रोफेसर, वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज), डॉ. नेताजी पाटील (रेडिऑलॉजिस्ट, वालावलकर रुग्णालय) यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत माहितीपूर्ण व्याख्याने, कॅडेव्हरवरती दुर्बिणीद्वारा शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण देण्यात आले. आंध्र प्रदेश, गुजरात, दिल्ली, तामिळनाडू, वाराणसी, मदुराई, औरंगाबाद अशा विविध ठिकाणांहून न्युरोसर्जन्स, ऑर्थोपिडिक सर्जन्स असे सात उच्चशिक्षित डॉक्टर्स या कार्यशाळेचा लाभ घेण्यासाठी आले होते. त्यांना डॉ. सतीशचंद्र गोरे आणि डॉ. सुनील नाडकर्णी यांनी मणक्यातील सरकलेल्या चकतीवर दुर्बिणीद्वारे करावयाच्या शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण दिले. या शस्त्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे रुग्णाला संपूर्ण भूल न देता, फक्त १ सेंटिमिटरचा छेद देऊन ही बिनटाक्याची शस्त्रक्रिया केली जाते. कार्यशाळेत या कालावधीत अशा १० शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामुळे सहभागी डॉक्टर्स अशा शस्त्रक्रियेत पूर्ण प्रावीण्य मिळवूनच परततात, हे या कार्यशाळेचे वैशिष्ट्य आहे.




*कार्यशाळेत सहभागी प्रशिक्षणार्थी डॉक्टरांसमवेत, डावीकडून –१) डॉ. अरुण एम. २) डॉ. अशोक रेड्डी ३) डॉ. नेताजी पाटील, ४) डॉ. अमीत गुप्ता, ५) डॉ. सुनील नाडकर्णी, ६) डॉ. सतीशचंद्र गोरे ७) डॉ. अजीत सैगल ८) डॉ. के.एस.पी. योगानंदन ९) डॉ. श्रीकांत दहिभाते १०)डॉ. श्रीकांत धनानी ११) डॉ. सुयश इंगळे*

## – कार्यशाळेबद्दल डॉक्टरांनी सांगितलेले अनुभव –

१) **डॉ. अशोक रेड्डी, ऑर्थो. (तिरुपती )**– हा एक आठवडा अतिशय संयोजित होता. संपूर्ण वेळापत्रक अतिशय नियोजित होते. व्हॉट्सअप ग्रुपवर सगळी माहिती दिली जात होती. या कार्यशाळेत जाण्यापूर्वी मला एन्डोस्कोपीबद्दल कोणतीही माहिती नव्हती. एन्डोस्कोपीबद्दल सर्व काही जाणून घेऊन आता मी खूप आनंदी आहे आणि आता मी ही शस्त्रक्रिया करणार आहे.

२) **डॉ. अमित गुप्ता, न्युरोसर्जन (दिल्ली)**– ही एक उत्कृष्ट कार्यशाळा होती. या कार्यशाळेने मला एंडोस्कोपिक आणि वेगवेगळ्या दृष्टीकोनांसह शस्त्रक्रियांबद्दल अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत केली आहे.

३) **डॉ. अरुण एम., ऑर्थो. (मदुराई)**– कार्यशाळा अतिशय उपयुक्त होती. पहिल्या दिवशी मी जे काही विचार केले होते ते शेवटच्या दिवशी पूर्णपणे बदलले. पहिल्या दिवशी माझ्या मनात शंका होती की मी शस्त्रक्रिया करू शकेन की नाही, पण आता सर्व वरिष्ठ मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली हे शक्य आहे असा माझा विश्वास आहे.

४) **डॉ. के. एस. पी. योगानंदन, ऑर्थो. ( तिरुचेन्गोडे, तामिळनाडू)**– मी गेल्या २–३ वर्षांपासून एंडोस्कोपी करत आहे. पण तरीही अनेक शंका होत्या. कार्यशाळेने निश्चितपणे मला बरेच काही शिकण्यास मदत केली आणि माझ्या सर्व शंका दूर केल्या.

५) **डॉ. श्रीकांत धनानी, ऑर्थो. (भुज)**– माझ्यासाठी एंडोस्कोपी हे स्वप्न होते, जे मला माझ्या PG दिवसांपासून शिकायचे होते. मला डॉ. गोरे यांचा मेल आला म्हणून मी भारावून गेलो आणि माझ्या मित्रांना याबद्दल सांगितले. माझ्या सर्व मित्रांनी मला सांगितले की डेरवण सारख्या ग्रामीण भागात तू काय शिकशील. पण सगळी व्यवस्था अपेक्षेपलीकडे होती, वसतिगृह आणि जेवण छान होते. मी एंडोस्कोपीबद्दल खूप शिकलो. सर्व काही शिकलो. तुमच्या मार्गात अनेक अडथळे येतील आणि बरेच लोक विरोध करतील पण तुम्ही जे योग्य आहे ते केले पाहिजे. या अनुभवाने मला एक वैद्य आणि सर्जन म्हणून पूर्णपणे बदलून टाकले. खूप खूप धन्यवाद.

६) **डॉ. श्रीकांत दहिभाते, ऑर्थो. (औरंगाबाद)**– जीवनाच्या शिखरावर पोहोचल्यानंतर सामान्य लोक आरामात बसतात, पण तुम्ही जे करत आहात ते कल्पनेच्या पलीकडचे आहे. तुम्ही विकसित केलेल्या तंत्राबद्दल तुम्ही समाजाला शिक्षित करत आहात. त्यामुळे तुमच्या समर्पण आणि मेहनतीबद्दल मी तुमचे आभार मानू इच्छितो. माझ्या पहिल्या ppt मध्ये शस्त्रक्रियेच्या संदिग्धतेबद्दल, आत्मविश्वासाच्या अभावाबद्दल मनात गोंधळ होते. आता मला १००% खात्री आहे की ते सर्व गोंधळ माझ्या मनातून निघून गेले आहेत आणि मला शस्त्रक्रिया करण्याचा आत्मविश्वास मिळाला आहे. आता मी MRI शिकलो आहे आणि MRI वर काहीही चुकणार नाही. ही कार्यशाळा केवळ मणक्याच्या शस्त्रक्रियेबद्दल नव्हती तर तुम्ही तुमचे जीवन एका विशिष्ट कार्यासाठी आणि समाजासाठी कसे समर्पित करू शकता याबद्दल मला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. मी इथून केवळ मणक्याच्या शस्त्रक्रियेचे तत्त्वज्ञान आणि त्यातील तंत्रे घेऊन जात नाही तर माझ्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करू शकणाऱ्या बऱ्याच गोष्टींसह जात आहे. जेवण खूप स्वादिष्ट होते आणि प्रत्येकाने येथे सर्व गोष्टींचा आनंद घेतला.

७) **डॉ. अजीत सैगल, ऑर्थो. (वाराणसी)** – मी आता साठ वर्षांचा आहे, पण या वयातही मला येथे खूप शिकायला मिळाले आणि नवीन बरेच काही मला माझ्या प्रॅक्टिसमध्ये करता येईल. आणि येथे मिळालेल्या ज्ञानाचा मी नक्कीच पुढे उपयोग करणार आहे. येथे अत्यंत उत्तम काम अनेक क्षेत्रात सुरू आहे आणि मला येथील वातावरणात अत्यंत शक्तिशाली व्हायब्रेशन्स जाणवली.

## 'डेरवण एनर्जीया' फुटबॉल स्पर्धेत 'रीवा एफसी' संघाला दुहेरी विजेतेपद

श्री विठ्ठलराव जोशी चरिटीज ट्रस्टच्या क्रीडासंकुलात दि. २७ ते ३० जानेवारी या कालावधीत 'डेरवण एनर्जीया फुटबॉल स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले होते. १५वर्षांखालील आणि १७ वर्षांखालील वयोगटातील मुलींसाठी आयोजित केलेल्या या स्पर्धेत ९ संघांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेसाठी हरयाणा, मध्यप्रदेश आणि कर्नाटक येथूनही संघ सहभागी झाले होते. २ लाख रुपयांची रोख पारितोषिके आणि चषक, प्रमाणपत्रे देवून विजेत्या संघाना गौरवण्यात आले.

लीग आणि नॉक आउट पद्धतीने खेळविण्यात आलेल्या या स्पर्धेत रीवा एफसीच्या दोन्ही संघांनी दोन्ही गटात वर्चस्व नोंदवले. १७ वर्षाखालील मुलींच्या गटातील पहिल्या सामन्यात रीवा एफसी (हरयाणा)ने मानस फाउंडेशनचा (कर्नाटक) २–० असा पराभव केला साक्षी चाउस व सुमय्या शेख यांनी गोल केले. दुसऱ्या सामन्यात ताराराणी विद्यापीठ (कोल्हापूर) वर ३–० ने मात केली पूर्वा गायकवाडने दोन तर सुमय्या शेख हिने एक गोल केला. तिसऱ्या सामन्यात मध्यप्रदेशातील बारवानी एफसीवर २–० मात करून रिवा एफसी संघाने आगेकूच केली. पूजा आणि सुमय्या या दोघींनी गोल नोंदवले. अंतिम सामन्यात पुण्याच्या स्टेपओव्हर फुटबॉल अकॅडमीचा एकमेव गोलने पराभव करून रिवा एफसीने विजेतेपद पटकावले.

पंधरा वर्षाखालील मुलींमध्ये पहिल्या सामन्यात रीवा एफसीने ताराराणी विद्यापीठाचा ३–० असा पराभव केला आणि त्यामध्ये अंतिम, वंशिका आणि ज्योती यांनी गोल केले. दुसऱ्या सामन्यात मानस फाउंडेशनवर २–० अशी मात करुन आगेकूच केली. आरती व रेखा यांनी गोल केले. ताराराणी विद्यापीठ कोल्हापूर विरुद्धचा सामना बरोबरीत सुटला. अंतिम सामन्यात तिने मानस फाउंडेशनचा एकमेव गोलने पराभव करत अजिंक्यपद पटकावले. संध्याने या विजयी गोलची नोंद केली.

खास मुलींसाठी फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करून 'एसव्हीजेसीटी'ने महिला फुटबॉलसाठी एक नवी सुरुवात करून दिली आहे. मोठी रोख पारितोषिके दिल्यामुळे आम्हाला एवढ्या दूरवरून येऊन येथील स्पर्धेत सहभाग नोंदवता आला. त्यासाठी आम्ही संस्थेचे आभारी आहोत अशा भावना हरयाणा येथून आलेले प्रशिक्षक नरेंद्र तोमर यांनी व्यक्त केल्या. लहान वयाच्या मुलींसाठी आयोजित केलेली आणि उत्तम निवास, भोजन, क्रीडांगण यासारख्या सुविधा असलेली ही एकमेव स्पर्धा आम्ही अनुभवली असे रिवा एफसीचे प्रमुख प्रशिक्षक कमलेश मरडिया यांनी सांगितले.

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



*१५ वर्षांखालील मुलींचा विजेता संघ*



*१५ वर्षांखालील मुलींचा उपविजेता संघ*



*१७ वर्षांखालील मुलींचा विजेता संघ*



*१७ वर्षांखालील मुलींचा उपविजेता संघ*



*१७ वर्षाखालील गटाची गोल्डन बूट विजेती खुशबू सरोज*



*१५ वर्षांखालील मुलींचा अंतीम सामना सुरू करताना डॉ. ऋता मुल्हेरकर*

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०